**The South Asian Academic Research Chronicle** **ISSN 2454-1109**

**A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal**

**Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024**

# संत साहित्याची विश्वात्मकता

**डॉ. विठ्ठल शंकर केदारी**
सहयोगी प्राध्यापक व प्रमुख मराठी विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किल्लेधारूर.

मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात संतांनी लिहिलेल्या निर्माण केलेल्या साहित्याचे योगदान महत्त्वाचे आहे. हे साहित्य अभंग, ओवी, आरत्या, भूपाळी, ग्रंथरचना आणि विविध प्रकारच्या रचनांतून लिहिले गेले. संत ज्ञानेश्वरांनी उभा केलेला वारकरी संप्रदाय बाराव्या शतकात उदयास आला. पंढरपूरचे विठ्ठल दैवत मानून उपासना या संप्रदायाने सुरू केली. जीवनात विविध कृती करावयास लावणारा व करवून घेणारा सखा पांडुरंग आहे विठ्ठल आहे. या भावनेने वारकरी संप्रदायात आलेल्या वेगवेगळ्या जाती-धर्मातील संतांनी अभंग रचना केल्या. जीवन जगत असताना समाजाकडून झालेली उपेक्षा, जातीयता, स्पृश्य-अस्पृश्यतेचे चटके आणि मनातील पांडुरंगाविषयीचा भक्तीभाव विविध अभंगांच्या माध्यमातून व्यक्त केला. केवळ अभंग रचनाच नाही तर गद्य स्वरूपामध्ये वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत यांतील कथा काव्यांच्या आधारे ग्रंथांची निर्मिती करून समाजाला बोध करून देण्याचे कार्य केले. समाजाला सहज समजेल, पचेल, रूचेल अशा आशय, विषय आणि भाषेच्या माध्यमातून झालेले अभंग लेखन व ग्रंथ लेखन सामान्य माणसाला सहज सोप्या पद्धतीने विचार देतात. सहाजिकच या विविध प्रकारच्या रचनांच्या माध्यमातून वाचकाला विश्वात्मकतेच्या मूल्यांचा बोध होतो. विश्वात्मकता हे मूल्य संतांनी लेखनातून मांडताना संपूर्ण विश्वाच्या कल्याणाचा विचार दिला. हा विचार विश्वव्यापक असून विश्वातील प्रत्येक जीवाला सुख-समाधान प्राप्त करून विश्व कल्याणाची याचना करताना दिसतात.

मराठी संत परंपरेचा पाया बांधणारे संत ज्ञानेश्वर महाराज पसायदानाच्या रूपाने विश्वातील प्रत्येक जीवाचे कल्याण करण्याची प्रार्थना ईश्वराकडे करताना दिसतात. संत ज्ञानेश्वर केवळ स्वहित किंवा आपल्याच राष्ट्रातील व्यक्तींचे जीवन सुखी होण्यासाठी याचना करत नाहीत. तर विश्वातील प्रत्येक जीवाला आनंदाने, सुखी-समाधानाने जीवन व्यतीत करता यावे यासाठी परमेश्वराकडे प्रार्थना करतात. "महाराष्ट्रातील महानुभाव पंथाबरोबरच वारकरी पंथाची वाटचाल सुरू होती. संत संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव या पंथाचे संस्थापक व प्रेरणास्थान होते. तत्कालीन समाज जीवनातील अनेक अप्रिय गोष्टींचे त्यांनी अवलोकन केले. शेवटी काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर यांच्या अधीन झालेली ही माणसे सत्य, शांती, विवेक, वैराग्य व आत्मिक समाधान या गुणांना पारखे होत आहेत हे संत ज्ञानेश्वरांनी पाहिले. अशा स्थितीत या अज्ञानी, मोहवश लोकांना मार्गदर्शन करावयाचे असेल तर, वैदिक धर्माची ओहोटी थांबवायची असेल तर, या भोळ्या भाबड्यांच्या धर्मभावनेला अध्यात्म विचारांची बैठक मिळवून देण्याशिवाय गत्यंतर नाही. अशी संत ज्ञानेश्वरांची खात्री पटली. दलितोधाराच्या दलितोद्धाराच्या प्रेरणेतून त्यांनी धर्म जागृतीचे कार्य हाती घेतले भक्तीचा सरळ सोपा मार्गच जनउद्धार करू शकेल असे त्यांना वाटले आणि समाजातील सर्वच आबालवृद्धांना व जाती, पंथांना एकाच

झेंड्याखाली आणून त्यांनी प्रथम एकमेकांपासून जातीय कट्टूतेने दुरावलेली मने एकत्र आणली. ही सामाजिक क्रांतीच वारकरी पंथाच्या स्थापनेस पूरक ठरली. सर्व समाज या मोक्षाच्या सोप्या व सरळ मार्गाला अनुसरू लागला आणि पंढरीच्या विठ्ठलाला आपले आराध्य दैवत मानून भजनकीर्तनात रंगून भक्तीचा मळा फुलवू लागला आणि पाहता पाहता वारकरी पंथ वाढत गेला."[1] संत ज्ञानेश्वर व संत नामदेव यांनी समाजातील दबलेले, अन्याय, अत्याचाराला, शोषणाला बळी पडलेल्या समाजाच्या व्यथा वेदना साहित्याच्या माध्यमातून प्रारंभी काही प्रमाणात शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला. वारकरी संप्रदायातील संतांचे कार्य एका विशिष्ट धर्म, जातीकरिता मर्यादित राहीले नाही. 'यारे यारे लहान थोर | याती भलते नारी नर |' अशी व्यापक विश्वात्मक भूमिका संतांनी घेतली. भारतीय समाज व्यवस्थेतील बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार याबरोबरच इतर वर्गांना सामावून घेणारा वारकरी संप्रदाय आहे 'खटनट यावे शुद्ध होऊणि | जावे दवंडी पीटी भावे चोखामेळा' या संप्रदायाने माणूस महत्वाचा मानून माणुसकी या मूल्याला महत्त्वाचे स्थान दिले. मानवतेच्या मूल्यांची शिकवण जगाला देत हा संप्रदाय मोठ्या प्रमाणात विस्तारलेला आहे. या संप्रदायात विविध जाती धर्मातील संत निर्माण झाले. त्यांनी अभंग रचनेच्या माध्यमातून भागवत संप्रदायाचा विकास केला. यामध्ये संत नामदेव, गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, सेना न्हावी, चोखामेळा, बंका महार, संत निर्मळा, संत बहिणाबाई, संत गाडगेबाबा आणि संत तुकडोजी महाराज अशा विविध जाती धर्मातील संतांचे कार्य अतुलनीय ठरले. आपल्याला जीवन जगत असताना सहन कराव्या लागलेल्या यातना, व्यथा, वेदना आणि कष्टाची कामे करताना करताना विठ्ठलाचे नामस्मरण करून दैनंदिन कामे केली. प्रसंगांन्वये कष्टाची कामे करताना मृत्यूही पत्करावा लागला संत जनाबाई सारख्या कवयित्रीने अभंग रचताना विठ्ठलाला आपलेसे करून घेतले. दळण-कांडणासारखी कामे करताना तिला सर्वत्र पांडुरंगाचे रूप असल्याचे दिसते. किंबहुना हे कार्य करत असताना साक्षात विठ्ठल तिला मदत करतो असे ती अभंगातून व्यक्त करते. यामुळे परमेश्वरमय झालेला भक्त ईश्वराच्या सानिध्यामुळे आनंदी जीवन जगतो. आपल्या सर्वच कृतीयुक्तीतून परमेश्वराचे अस्तित्व शोधताना दिसतो. परमेश्वराचे सौज्वळ रूप भक्ताला निरागस वाटते.

संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून वैचारिक दान दिले. निसर्गाचे संवर्धन केले पाहिजे. यासंबंधीची शिकवण अभंगांच्या माध्यमातून संत तुकाराम जनतेला देतात. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे, पक्षीही सुस्वरे आळवीतो.

येणे सुखे रूपे एकांताचावास, नाही गुणदोष अंगा येते' या पद्धतीने संत तुकाराम निसर्ग पूजक आहेत. आज प्रत्येक घटक निसर्गापासून दूर चालला आहे आधुनिकीकरण आणि यांत्रिकीकरणाच्या नावाखाली असंख्य झाडांची कत्तल होत आहे. शेकडो वर्षांपासून उभी असलेली झाडे क्षणात नाहीशी होत आहेत. या तुलनेत वृक्षांच्या रोपांची लागवड होत नाही. संत तुकाराम वृक्षांना सोयरे म्हणतात या सोयऱ्यांच्या प्रमाणे वृक्षांची काळजी घेऊन संवर्धन करावयास हवे असे तुकाराम महाराजांना वाटते याच वृक्ष, लता, वेलींवर पक्षी बसतात, सुरात गाणे गातात. निसर्गातील पशुपक्ष्यांना जेवण जगण्यासाठी निसर्गच आवश्यक असतो. येथे वास्तव्य करणाऱ्या सर्व जीवांना अन्न उपलब्ध करून देण्याची गरज

निसर्गातूनच पूर्ण होते. जीवांच्या जगण्याची काळजी संत तुकारामांच्या अभंगातून प्रतीत होते. पशुपक्षी व निसर्गावर अवलंबून इतर सर्वच जिवांना जगण्याचा हक्क आहे. त्यामुळे निसर्गाचे संरक्षण होणे गरजेचे आहे. वैचारिक बोधाच्या अनुषंगाने संत तुकाराम महाराजांविषयी म्हणता येते की, "तुकारामांच मन आकाशासारखं विशाल आहे. त्यांच्या अंतकरणात कोणतीही भेदभावना उरलेली नाही. ज्यामुळे त्यांचे सगळे स्वार्थ गळून गेले आहेत. तुकारामासारख्या साधू पुरुष भोवतालच्या सृष्टीशी समरस होऊन सदैव जगला. सामान्य माणसाच्या हृदयात प्रेम भावना काही प्रमाणात असते. पण तुकारामांच्या हृदयात मात्र निखल प्रेम ओसंडून वाहतं, द्वेष, मत्सर, कटुता, परकेपणा किंवा हे माझं म्हणून मला प्रिय आहे. माझं नाही म्हणून ते अप्रिय असं त्यांच्या मनात कधीच आलं नाही. साऱ्या सृष्टीशी त्यांचा आत्मिक संबंध जुळला. केवळ स्वतःसाठी काही मिळवावं अशी स्वार्थी वृत्ती नसल्यामुळे सारं विश्व त्यांना आत्मरूपाचा अविष्कार आहे असा अनुभव आला. तुकारामांच्या प्रेम शक्तीचा व निसर्गभक्तीचा सतत विकास होत गेला. आधी तुकाराम लहान होते. एखाद्या ओढ्यासारखे, मात्र चिंतनाने तपस्या आणि अनुभूतीने वाढत गेले. एखाद्या ओढ्यासारखं, ओढ्याचं स्वरूपांतर नदीत झालं व एक दिवस नदीच सागर झाली. त्याच प्रमाणे साऱ्या सृष्टीच्या अंतकरणाशी संवाद करू लागले."[2] संत तुकारामांनी समाज जीवनातील अंधश्रद्धांवर अभंगांच्या माध्यमातून प्रहार केला. विज्ञानाची ओळख लोकांना अभंगांच्या रचनांतून स्वातंत्र्य पूर्वीच्या कालखंडात पहिल्यांदा करून देणारा महान संत म्हणजे संत तुकाराम महाराज. समाजातील विसंगतीवर अचूकपणे बोट ठेवून वास्तव दाखवून देऊन सत्य सर्वांना समोर मांडले. अगदी दैनंदिन प्रापंचिक जीवनात पुत्र प्राप्तीसाठी लोक विविध प्रकारे देवधर्म, कर्मकांडे, विधि करतात. प्रसंगी पशुबळी दिले जातात. 'नवसे कन्या पुत्र होती, तरी का करणे लागे पती' नवसाने काहीही मिळत नाही असे रोखठोकपणे स्पष्टपणे संत तुकारामांनी समाजाला सांगितले. परंपरागत पद्धतीने चालत आलेल्या गोष्टी ह्या भ्रामक समजूतीतून निर्माण झालेल्या आहेत. अडाणी, अशिक्षित काबाड कष्ट करणाऱ्या वर्गाचे धर्माच्या नावाखाली आर्थिक शोषण केले जाते. हे केवळ अशिक्षितपणामुळे घडते. याकरिता संत तुकाराम महाराज आपल्या अभंगांच्या माध्यमातून समाजाला उपदेश सांगून विज्ञानवादी दृष्टी स्वीकारायला भाग पाडता. म्हणून संत तुकारामांच्या अभंगातून आलेला विषय हा विश्वात्मक पातळीवर सत्याच्या कसोटीवर स्वीकारावा लागतो. विश्वात्मक सत्याचा पुरस्कार करणारा संत जनतेला वास्तवज्ञान सांगून आचरण करायला सांगतो.

संत कबीर मानसाच्या मनात असलेली परमेश्वराच्या भेटीची ओढ दोहे माध्यमातून सांगतात. प्रत्येकाच्या मनामध्ये परमेश्वर भेटीची ओढ असते. मग ही व्यक्ती मुस्लिम, हिंदू, ख्रिश्चन, बौद्ध अथवा कोणत्याही धर्मातील असो. प्रत्येक धर्मात सांगितल्याप्रमाणे जन्म आणि मृत्यू यांतून परमेश्वराच्या शोधाकडे जाणारा मार्ग अंतिम सत्याकडे घेऊन जातो. आपले जीवन संकट मुक्त आणि आनंददायी होण्यासाठी हा सगळा खटाटोप असतो. "तुर्क मशीने हिंदू देहरे आपआप को भाई अलख पुरुष घर, भितरे ता का द्वार न पाय"[3] या रचनांतून वास्तवतेची जाणीव करून दिली. ईश्वराच्या, परमेश्वराच्या शोधात निघालेला भक्त विविध ठिकाणी देवाचे अस्तित्व शोधतो. मात्र देवाचे शोधार्थ निघालेल्या मानवाच्या मनाचे वर्णन करताना संत कबीर म्हणतात, "मन मथुरा दिल द्वारिका, काया कासी जान

दस द्वारे का देहरा, ता मै जोती पिछान"[4] संत कबीर परमेश्वराच्या भेटीसाठी निघालेल्या व्यक्तीला स्पष्ट शब्दात सुनावतात तीर्थयात्रा करताना तुझे मन मथुरेस तर चित्त द्वारकेत आणि काया काशीमध्ये अशी तुझी स्थिती असते. पण तुझ्याकडे दहाद्वार असलेल्या देहरुपी देव्हाऱ्यात असलेल्या प्रभूला तू ओळखत नाहीस. परमेश्वर इतरत्र नसून तो मानवाच्या शरीरात सामावलेला आहे. व्यक्तीच्या देहातील परमेश्वराचे रूप शोधता आले पाहिजे असे संत कबीर आपल्या रचनांतून सांगतात.

आज संतांच्या साहित्याचा प्रचार प्रसार मोठ्या प्रमाणात होतो आहे. संत ज्ञानेश्वर ते आजच्या कालखंडातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्याचे प्रकाशन मोठ्या प्रमाणात होते. तुकडोजी महाराजांचे साहित्य वाचकांपर्यंत मोठ्या प्रमाणात ग्रंथसंपदा उपलब्ध करून दिली जात आहे. "राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विविध ग्रंथांचं प्रकाशन गुरुकुंज आश्रमानं मोठ्या प्रमाणात केलं व यंदा त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांच्या साहित्याचा विविधांगी विचार करणारे ग्रंथ प्रसिद्ध झाले. 'ग्रामगीते'च्या अनेक आवृत्या नव्वदीनंतरही प्रकाशित झाल्या"[5] अशा रीतीने संतांचे साहित्य कालखंडातही वाचकांना विचार प्रवृत्त करते. संतांनी साहित्य लेखनातून दिलेला विचार माणसाला माणूसपणाचे जीवन दाखविणारे असून आपापसातील दैवत्वाचा शोध घेण्यास मार्गदर्शन करते.

"महाराष्ट्रीय संतांनी परमेश्वराला त्याच्या तळघरातून गुहेतून किंवा मंदिराच्या गाभाऱ्यातून बाहेर काढून जणू काही सर्व समाजाच्या पुढे आणून ठेवले. त्या संतांमध्ये अग्रेसर म्हणजे संत चोखामेळा, एकनाथ स्वामींनी आपले वेदांताचे तत्त्वज्ञान समाजाच्या निरनिराळ्या थरात, जातीत व्यवसायात, जीवितातील प्रसंगात सारखे खेळविले. एकनाथ स्वामींनी आपला वेदांत तत्वज्ञानाच्या रूपाने स्वतंत्रपणे सांगता आला असता पण त्यांच्या मनाचे उत्थान असे होते की वेदांताचे लोन शेवटपर्यंत नेऊन पोहोचविले पाहिजे म्हणून त्यांनी थोडासा अलंकार करून तो वेदांत सर्व प्रकारच्या तीनही व्यवसायात, जातीत, प्रकृतीत येऊन घातला आहे."[6] संत एकनाथांनी समाजाला समजेल रूचेल आणि पटेल अशा पद्धतीने लेखन केले. अशिक्षित आणि शिक्षित दोन्हीही प्रकाराच्या व्यक्ती त्यांच्या लेखनाचा केंद्र होत्या. भारुड व गवळणींच्या स्वरूपातून अशिक्षित माणसाची प्रबोधन घडविले. एकनाथी भागवत, रुक्मिणी स्वयंवर या ग्रंथरचनांतून शिक्षित वर्गासाठी विचार दिले.

भारतीय माणूस हा परंपरानिष्ठ व पूजक आहे. अनेक वर्षांपासून चालत आलेल्या पिढ्यानपिढ्या श्रद्धा व अंधश्रद्धांची जोपासना करताना दिसतात त्या त्यांच्या धारणा आहेत. ग्रंथवचनांच्या मार्फत सांगितलेल्या कृती वृत्तींचा आधार घेऊन जीवन जगतात परंतु काही नवीन निर्माण व्हावे, उदात्त घडावे, चांगले व्हावे त्यांना मनोमन वाटते. यासाठी भारतीय माणसाचे मन साचेबंधपणातून बाहेर पडण्यास तयार असते. प्रसंगी बंड करायलाही ते मागेपुढे पाहत नाहीत. मराठी भाषेत निर्माण झालेल्या संत साहित्यात बंडाची बीजे विविध प्रकारे दिसतात. आजवर निर्माण झालेले ज्ञान, ईश्वराची प्रार्थना, पूजाअर्चा आणि प्रतीती, संस्कृत ग्रंथ, मंत्र सूत्रातूनच होऊ शकते या संकेताविरुद्धच्या संकेतातूनच मराठीतील ग्रंथसंपदेला उभारी मिळालेली आहे. यास आपण संतांचे साहित्य म्हणतो. चोखामेळा आपल्या अभंगांच्या माध्यमातून सांगतात, "जोहार मायबाप जोहार, तुमच्या महाराचा मी महार, बहु भुकेला जालो तुमच्या उष्ट्यासाठी आलो."[7] ह्या अभंगातून विपण व दयनीय

अवस्था अंतर्मुख होते. वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था यातून प्रकर्षाने लक्षात येते. या समाजव्यवस्थेत पोटाची भूक कशाप्रकारे पूर्ण करावी लागते याचे अभंगातून आलेले वर्णन अभ्यासकाला हृदयद्रावक बनविते. समाजव्यवस्थेत विविध प्रकारच्या व्यक्ती असतात. त्यांच्या स्वभावानुसार कृती होतात. "प्रत्येक समाजात आत्ममग्न अहंकारी व्यक्ती असतातच. अशा लोकांच्या संकुचित विचारसरणीमुळे व त्यांनी आणलेल्या विकल्पामुळे मूळचे शंभर नंबरी सोने अधिक उजळते. ज्ञानेश्वरांपासून तो तुकाराम गाडगेमहाराजांपर्यंत सगळ्यांनीच निंदकांना नुसते धैर्यानेच तोंड दिले असे नाही तर त्यांना वाकवलेही. म्हणूनच तर, 'नम्र झाला भूता | देणे कोंडीले अनंता' असा उद्‌गार उमटतो."[8] शब्द शस्त्र म्हणून वापरण्याची किमया संत साहित्यात विशेषत्वाने आलेली दिसते. व्यवहार आणि अव्यवहार या दोन्ही गोष्टींची सांगड संतांनी घातली. 'आम्ही संन्याशी संन्याशी, सदा राहू एकांत देशी' अशी भूमिका घेऊन समाजासाठी कार्य करण्याची वृत्ती संतांची होती व्यक्ती मनातील अंतर विरोध रचनांतून टिपला. आज आधुनिक कालखंडात संतांनी निर्माण केलेल्या वैचारिक प्रसादाच्या ताटातील जे आवश्यक आहे ते डोळसपणाने घ्यायला हवे. संतांच्या व्यक्तिमत्व अलौकिक, बहुउद्देशी, मनोबोधि आणि उत्कट लिहिलेल्या अभंगांच्या स्वरूपातून लक्षात येते. संत तुकाराम म्हणतात त्याप्रमाणे 'तुका म्हणे झरा, मुळताच आहे खरा
झरा लागला सुखाचा, तेथे मापारी कइचा' असा विचार सामान्य माणसाला देणारे संत साहित्य दिशादर्शक ठरते. मध्ययुगीन कालखंडापासून निर्माण झालेल्या संत परंपरेतील लहान थोर संत सामान्य व साध्या पद्धतीने जीवन व्यतीत करणारे होते. यामुळेच ते सामान्यजनात असामान्य ठरल्याचे लक्षात येते. सर्वच संत परंपरेतील संतांनी मराठी भाषिकालाच नव्हे तर विश्वातील प्रत्येक माणसाला संत साहित्याच्या व संतवाणीच्या माध्यमातून दिलेला हा मोलाचा उपदेश आहे असे म्हणता येते.

**संदर्भग्रंथ सूची**

1. मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, संपादक प्रा. डॉ. सदाशिव सरकटे व इतर, पृष्ठ क्रमांक-108.
2. मध्ययुगीन भारतातील भक्ती आंदोलन, संपादक, डॉ. वनमाला रेड्डी, पृष्ठ क्रमांक-74.
3. मध्ययुगीन भारतातील भक्ती आंदोलन, संपादक, डॉ. वनमाला रेड्डी, पृष्ठ क्रमांक-71.
4. मध्ययुगीन भारतातील भक्ती आंदोलन, संपादक, डॉ. वनमाला रेड्डी, पृष्ठ क्रमांक-71.
5. पुण्यभूषण ८३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, पुणे, 2010, स्मरणिका, पृष्ठ क्रमांक-89.
6. संत पंत व तंत, श्री. म. माटे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्रमांक-98.
7. प्रश्नशोध, केशव मेश्राम, पृष्ठ क्रमांक - 13.8. प्रश्नशोध, केशव मेश्राम, पृष्ठ क्रमांक-13.